विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ०६ / २०२१

विद्युत जोडणी न देता आकारलेल्या वीज देयकाबाबत

अमर अशोक डोके ..... अपिलार्थी

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, सोलापूर ग्रामीण (महावितरण) ..... प्रतिवादी

उपस्थिती

अपिलार्थीतर्फे :- अमर अशोक डोके

प्रतिवादीतर्फे :- अे. पी. हुवाले, कार्यकारी अभियंता, महावितरण सोलापूर ग्रामीण

कोरम : दिपक लाड

सनावणी दिनांक :- १२ मार्च २०२१

आदेश पारीत दिनांक :- ३१ मार्च २०२१

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६) नुसार ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडळ (मंच) यांनी विहित वेळेत आदेश पारित न केल्यामुळ अपीलार्थी ग्राहकाने सदरचे अभिवेदन दिनांक २२ डिसेंबर २०२० रोजी दाखल केले. या कार्यालयात दिनांक २८ डिसेंबर २०२० रोजीच्या

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

पत्रान्वये सदर गाऱ्हाण्यावर दिनांक २८ जानेवारी २०२१ पर्यंत अंतिम निर्णय देण्याचे मंचाला आदशीत करण्यात आले होते. मंचाचे अध्यक्ष व सदस्य (सी.पी.ओ.) ही दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे तांत्रिक कारणास्तव सुनावणी घेण्यास सदस्य सचिव यांनी असमर्थता दर्शविली, व त्याबाबत, मंचाचे सदस्य सचिव यांनी दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी कळविले. म्हणून अपिलार्थी यांनी दिनांक १०.०२.२०२१ च्या पत्राद्वारे त्यांचे अभिवेदन दाखल करून घेण्यात यावे अशी विनंती केली. सबब सदर अभिवेदन विनियम १७.९(२) नुसार दाखल करून घेण्यात आले.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सादर केलेले प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

अ) अपिलार्थी यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी विहिरीवरील शेतीपंपासाठी नवीन वीज जोडणी अर्ज मोहोळ परिमंडळ कार्यालय सोलापूर येथे सादर केला होता, व त्यासाठी रू.६६७०/- चा भरणा दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी केला. सदर अर्जावरून अपिलार्थी यांचा नवीन वीज ग्राहक जोडणीच्या प्रतिक्षा यादीत समावेश झाला होता. अपिलार्थी यांची विहिर व अस्तित्वात असलेल्या वीज वाहिनी मधील अंतर अंदाजे ५ खांबाचे आहे व त्याप्रमाणे वीज वाहिणीची उभारणी केल्यानंतर वीज पुरवठा सुरू करण्याबाबत अपिलार्थी यांनी कार्यकारी अभियंता सोलापूर (ग्रामीण), उपअभियंता मोहोळ व कनिष्ठ अभियंता बेगमपूर यांना दिनांक २० फेब्रुवारी २०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

आ) अपिलार्थी यांना वीज जोडणी मिळालो नसतानाही महावितरणकडुन अपिलार्थी यांच्या नावे एकुण रू.५९,५१०/- चे वीज देयक आकारण्यात येत असल्याचे एप्रिल २०१७ साली समजले. म्हणून दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी महावितरणकडून कोणतीही वीज जोडणी करण्यात आलेली नाही वा चालु करण्याबाबतचा तसा कोणताही अर्ज किवा करार करण्यात आलेला नाही असे लेखी अर्जान्वये महावितरणला कळविल व वीज देयक कमी करण्याबाबतची विनंती केली. सदर कार्यालयाकडून वीज देयक कमी करण्यासाठीचा प्रस्तावसुध्दा बिलिंग विभागास सादर करण्यास आला होता. त्याच दरम्यान अपिलार्थी यांच्या लक्षात आले की, महावितरणकडुन अपिलार्थी यांचे वीज देयके दिनांक १ जुलै २०१४ पासून चालु

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

करण्यात आली आहेत, याबाबत अपिलार्थीस लेखी कळविण्यात आलेले नाही. सदर बाबीबाबत प्रतिवादींना कळविले असता कोणतीही कार्यवाही केली नाही.

(इ) अपिलार्थी यांनी कार्यकारी अभियंता, सोलापूर ग्रामीण व अधिक्षक अभियंता सोलापूर यांना दिनांक २७ डिसेंबर २०१७ रोजी लेखी स्वरूपात वीज जोडणी नसतानाही वीज देयके आकारणे चालु असल्याबाबतचा तक्रार अर्ज केला. तसेच सदर बाब प्रत्यक्ष भेटीतही सविस्तर सागितली. स्थळ तपासणी अहवाल, वीज वापर नसल्याचा कार्यवाही रिपोर्ट वरिष्ठांना सादर करण्यात आला. याबाबत वारंवार तक्रार अर्ज देऊनही काहीही कारवाई झाली नाही. सद्यस्थितीत अपिलार्थी यांचा वीज जोडणी बंद करण्याचा कोणतीही अर्ज नसताना, वीज पुरवठा दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी कायमस्वरूपी बंद केला. शिवाय वीज देयकही कमी करून दिल नाही. प्रतिवादी यांच्या या कृतीमुळे अपिलार्थी यांचे वीज कनेक्शनच्या प्रतिक्षा यादीमध्ये समावेश होऊ शकला नाही, परिणामी वीज जोडणी मिळाली नाही. २०१४ साली अपिलार्थी यांच्यासोबत योग्य ती रक्कम भरून वीज मागणी केलेल्या ग्राहकांना वीज जोडणी मिळाली आहे. सध्या २०१८ साली कोटेशन भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देणे चालू आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे अपिलार्थी यांचे वीज जोडणी चालू असल्याचे दाखवण्याच्या कृतीमुळे अपिलार्थी यांचा प्रतिक्षा यादीमध्ये नाव येऊनही वीज जोडणी मिळालेली नाही. ४ ऑगष्ट २०२० च्या स्थळ तपासणी करून अपिलार्थी यांच्याकडून वीज वापर होत नसल्याबाबतचा अहवाल वरीष्ठांकडे पाठविला.

(ई) प्रतिवादी यांच्याकडुन अपिलार्थी यांचे वीज जोडणी चालु नसल्यामुळे वेळोवेळी वीज देयके कमी करणे बाबत विनंती केली असताना व जोडणी बद करणेबाबत अर्ज क्र.१९४५७४५५ मध्ये कोणतीही विनंती केली नसताना, महावितरणने दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी वीज पुरवठा कायमस्वरूपी बंद केला. सदर वीज जोडणी बंद केल्यामुळे दिनांक ३१ ऑगष्ट २०२० अंर्तगत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार केलो. कक्षाने *दिनांक १७ सप्टेंबर २०२० रोजी अर्जदाराने महावितरण कंपनीने बिलामध्ये उल्लेखलेल्या वीज पुरवठा दिनांकादिवशी अथवा त्यानंतरही सदर ग्राहक क्रमांक असलेल्या वीज जोडणीचा वापर केला गेला नसल्याचा ठोस पुरावा सादर केल्यानंतर सामनेवाला यांनी ग्राहकाचे*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

फिकटिशिअस एरीअर कमी करण्यासाठी मुख्य कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा असा निर्णय दिला. कक्षाचा निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक १२ डिसेंबर २०२० रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने निर्णय दिला नाही म्हणून अपिलार्थी यांनी ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ मधील कलम १७.२ नुसार विद्युत लोकपाल यांच्याकडे तक्रार दाखल केली. वीज देयकातील रक्कम कमी करून वा रद्द करण्यात यावो, कक्षाचा निर्णय रद्द करावा, वीज जोडणी पुन्हा चालु करून देण्यात यावी. वीजप्रवाह खंडीत कल्यामुळे अपिलार्थी यांचे आर्थिक नुकसान व मानसीक त्रास सहन करावा लागला. सदर प्रकरणाच्या चौकशीसाठी अधिकारी नियुक्त करून घटनास्थळ, जागा व दिलेल्या सर्व कागदपत्रांचे व त्याच्यावर अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करण्यासाठी कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी अपिलार्थी यांनी तक्रार अर्जात केली आहे.

३. प्रतिवादी यांनी दिनांक ५ मार्च २०२१ च्या उत्तरात नमुद केले आहे की,

अ) कक्षाचा आदेश योग्य असुन प्रतिवादी त्यांचे समर्थन करीत आहेत. अपिलार्थींनी शेतीपंपाच्या वीज जोडणीसाठी पावती क्र.१२६८७०२ द्वारे कोटेशनची रक्कम रू.६६०७/- चा "महावितरण आपल्या दारी" योजने अंतर्गत दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी भरणा केलो. जे शेतीपंपधारक अवैधरित्या वीज वापरत होते त्यांचा वीज पुरवठा नियमा अंतर्गत नियमित करून अखंडीत वीजपुरवठा द्यावा या मुख्य उद्दशाने सदर योजना राबविण्यात आली होती.

आ) अपिलार्थीस ५ पोल इतके लघुदाब वाहिनी लागते उभारावी लागते हे दर्शविण्याकरीता पावतीवर ०.३० किमी असे वीज पुरवठा करण्यासाठीचे अंतर नमुद आहे. अपिलार्थी यांचा वीज पुरवठा दिनांक १ जुलै २०१४ रोजी चालु झाल्याचे कागदोपत्री नोंद असल्याचे दिसते. अपिलार्थी यांनी दिनांक २० फेब्रुवारी २०१४ रोजी अर्ज दिला की, त्यांना ५ पोल टाकल्याशिवाय वीज पुरवठा नको असे असले तरी अपिलार्थी हे दिनांक १ जुलै २०१४ पासून वीज वापर करीत असल्यामुळे 'महावितरण आपल्या दारी' या योजने अंतर्गत

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

त्यांच्याकडुन योग्य ती रक्कम घेण्यात आली व वीज जोडणी देण्यात आल्याची नोंद कागदोपत्री घेण्यात आली व त्यानुसार पुढील वीज देयके आकारण्यात आली.

इ) अपिलार्थीने सदर वीज देयकांचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी कायमस्वरूपी बंद केला व अपिलार्थीच्या तक्रारीच्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता, बेगमपूर यांचे स्थळ तपासणी अहवालामध्ये वीज कनेक्शन नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने वीज वापर केलाच नाही याबाबतचा कोणताही ठोस पुरावा सादर केलेला नाही, केवळ अपिलार्थीच्या तक्रारीवरून तसा निष्कर्ष करता येणार नाही. अपिलार्थीचे वीज कनेक्शन कायमस्वरूपी बंद होऊन १ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटुन गेला असल्याने सदरचे कनेक्शन नियमानुसार पुन्हा चालू करता येणार नाही.

ई) अपिलार्थीने सन २०१४ मध्ये दिलेल्या वीज कनेक्शनबाबत सन २०२० मध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली तथापि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० (यापुढे ज्याचा उल्लेख "ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०" असा केला जाईल") मधील विनियम ७.९ (क) अन्वये २ वर्षाच्या आत सदर तक्रार दिलेली नाही त्यामुळे सदर तक्रार 'मुदतबाह्य' ठरते व केवळ याच कारणाने ती रद्द होण्यास पात्र आहे. अपिलार्थीकडे वीज कनेक्शन पोटी रू.१०५८००/- इतकी थकबाकी आहे. सदर थकबाकीची जबाबदारी टाळण्याकरीता खोटी तक्रार दाखल केली आहे.

उ) ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०(?) मधील विनियम २०.४ (इ) अन्वये दंडात्मक किवा दहशती नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही. अपिलार्थीने मानसिक त्रास व शेतीचे नुकसान भरपाई मिळावी म्हणून केलेली मागणी त्यांनी सिध्द केलेली नाही व तशी अप्रत्यक्ष भरपाई विनियमाप्रमाणे देताही येणार नाही.

ऊ) अपिलार्थीने विनाकारण तक्रार दाखल केलेली आहे, तसेच सकृत दर्शनी कोणतीही हानी किंवा नुकसान झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थीची तक्रार रद्द करण्यात यावी ही विनंती.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

४. कोव्हीड-१९ चा संभाव्य प्रादुर्भाव टाळण्यासाठी सदर अभिवेदनाची ई-सुनावणी दिनांक १२ मार्च २०२१ रोजी व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे घेण्यात आली. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांनी युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी सर्व संबधिताना वीज जोडणी नसतानाही वीज देयके जारी केल्याबाबतचा लेखी तक्रार अर्ज केला व त्याबाबत प्रत्यक्ष भेटोतही सविस्तर सांगितले. अपिलार्थी यांचो वीज जोडणी बंद / खंडीत करण्याचा कोणतीही विनंती अर्ज नसताना वीज जोडणी बंद केलो व वीज देयक कमी करून दिलो नाहीत. प्रतिवादी यांच्या या कृतीमुळे व अपिलार्थी यांचे नावाचा वीज कनेक्शनच्या प्रतिक्षा यादीमध्ये समावेश होऊ शकला नाही, परिणामी त्यांना वीज जोडणी मिळाली नाही. सध्या २०१८ साली कोटेशन भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम चालू आहे; अपिलार्थी यांची वीज जोडणी चालु नसतानाही वेळोवेळी जारी केलेली वीज देयके कमी करणे बाबत विनंती केली असताना व जोडणी बंद करणेबाबत कोणतीही विनंती केली नसताना महावितरणने दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत केली. सुनावणी दरम्यान अपिलार्थीने वीज देयकातील रक्कम कमी करून वा रद्द करावी, कक्षाचा निर्णय रद्द करावा, वीज जोडणी पुन्हा चालु करण्यात यावी अशा मागण्या केल्या.

५. सुनावणी दरम्यान प्रतिवादीने नमुद केले की, कक्षाचा आदेश कायम ठेवावा. अपिलार्थीने सन २०१४ मध्ये दिलेल्या वीज कनेक्शनबाबत सन २०२० मध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली. ग्राहक गाऱ्हाणे विनियमा अंर्तगत २ वर्षाच्या आत तक्रार करणे गरजेचे होते. त्यामुळे सदर तक्रार 'मुदतबाह्य' ठरते व केवळ याच कारणाने रद्द होण्यास पात्र आहे. अपिलार्थीने मानसिक त्रास व शेतीचे नुकसान भरपाईची केलेली मागणी त्यांनी सिध्द केलेली नाही व तशो अपत्यक्ष भरपाई विनियमातील तरतूदीप्रमाणे देताही येणार नाही. अपिलार्थीकडे वीज कनेक्शन पोटी रू.१०५८००/- इतकी थकबाकी आहे. वास्तविक पाहता महावितरणतर्फे ज्या ठिकाणी कृषीपंप ग्राहक हे जवळ असलेल्या लघुदाब वाहिनीवर अवैद्य पध्दतीने शेतीपंपासाठी वीज पुरवठा घेतात अश्या सर्व ग्राहकांना नियमा अंर्तगत त्यांचा वीज पुरवठा नियमित करून त्यांना ग्राहक म्हणून समाविष्ठ करून वीज देयके देण्याची "महावितरण आपल्या दारी" (MAD) या योजने अंर्तगत मुख्य कार्यालयातर्फे सुचीत करण्यात आले. त्या अनुषंगाने अपिलार्थीस सुध्दा त्याचा

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

लाभ घेण्याच्या दृष्टीने त्यांचे कडून दिनांक १४ फेबवारी २०१४ रोजी पावती क्र.१२६८७०२ नुसार रू.६६०७/- भरणा करून घेतला व अपिलार्थीस लाभार्थी करून घेण्यात आले. विषेश म्हणजे या पावतीवरसुध्दा सदर योजनेचे नाव सक्षिप्त रूपात "MAD" असे लिहिलेले आहे. सर्वसाधारण वीज जोडणीसाठी MAD हि योजना उपलब्ध नव्हती. या ठिकाणी सन २०२० मध्ये अपिलार्थीने हे संपुर्ण प्रकरण नाकारणे हे पुर्णतः चुकीचे आहे व ते नियमानुसार वीज देयके भरण्यास बांधील आहेत. ज्या ठिकाणी अवास्तव / अवाजवी वीज देयके वितरीत केली आहेत, ती वीज देयके महावितरणच्या नियमानुसार दुरूस्त करून देण्यात येतील. कक्षाच्या आदेशात त्याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. सबब, अपिलार्थींचा अर्ज फेटाळण्यात यावा.

विश्लेषण व नित्कर्ष

६. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. या संपुर्ण प्रकरणात अपिलार्थींच्या अभिवेदनाचा बारकाईने अभ्यास केल्यास प्रथमदर्शनी ते हेतुपुरस्सररित्या वीज देयके न भरण्यासाठीच्या अविर्भावात केलेले अभिवेदन वाटते. याची कारणीमिमांसा खालीलप्रमाणे.

क) कोणताही वीज ग्राहक वीज पुरवठा मिळण्याकरीता जेव्हा परवानाधारकाकडे खर्च करतो, तेव्हा त्यास वीज पुरवठा मिळावा हे त्याचे एकमेव उद्दीष्ठ असते. असा वीज पुरवठा परवानाधारकाने कोणत्या प्रकारे द्यावा हा प्रश्न ग्राहकासमोर कधीही असू शकत नाही, किंबहूना, तो त्यांचा प्रातंच नाही. याचा सर्वस्वी निर्णय परवानाधारक घेत असतो. मात्र, दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी अपिलार्थीने रक्कमेचा भरणा महावितरणकडे केल्यानंतर लगेच दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या पत्राने त्यांना अमुक एका विशिष्ठ पध्दतीने वीज पुरवठा करावा असे पत्र लिहिले. असे पत्र लिहिण्यामागचे प्रयोजन लक्षात येत नाही.

ख) अपिलार्थीने त्यांच्या अभिवेदनात असेही नमुद केले की, *"कनेक्शन बंद करणे बाबत कोणतीही विनंती मी अर्ज क्रमांक १९४५७४५५ मध्ये केलेली नसतांना महावितरण कार्यालयाकडून माझे विज कनेक्शन कायमस्वरूपी दिनांक ०४/०४/२०१९ रोजी बंद करण्यात आलेले आहे."* यावरून

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

सुध्दा प्रथमदर्शनी असे दिसते की, त्यांच्याकडे महावितरणची वीज जोडणी होती अन्यथा अपिलार्थीने असे नमुद करण्याचे काहीही प्रयोजन नाही.

ग) प्रतिवादीने १ जुलै २०१४ पासून अपिलार्थीच्या वीज जोडणीसाठी वीज देयके वेळोवेळी जारी केल्याचे कागदपत्रावरून दिसून येते. वीज जोडणी नसताना, प्रदीर्घ कालावधीकरीता म्हणजे सन २०१४ पासून अशी वीज देयके कुठलाही परवानाधारक जारी करणार नाही.

घ) अपिलार्थीने स्थळ तपासणी अहवालाचा हवाला देऊन असे नमुद कले की, त्यांच्या शेतातील अस्तित्वात असलेली विहिर बुजलेली (बंद) आहे. परंतू या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे सदर तपासणी हि ऑगष्ट २०२० या महिन्यातील आहे, व त्यामुळे या अहवालावरून २०१४ या परिस्थितीचे आकलन व सत्यतेची खातरजमा होत नाही. शिवाय विहिर बुजलेली / बंद असतांना अपिलार्थीने वीज जोडणी मागणी करणे ह्याचे आकलन होत नाही.

ण) अपिलार्थी यांना "महावितरण आपल्या दारी" (MAD) या प्रतिवादी यांच्या योजने अंर्तगत वीज पुरवठा करण्यात आला. त्या अनुषंगाने अपिलार्थीस सुध्दा त्याचा लाभ देण्याच्या दृष्टीने त्यांचे कडुन दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी पावती क्र.१२६८७०२ नुसार रू.६६०७/- भरणा करून घेतला व अपिलार्थीस लाभार्थी करून घेण्यात आले. विषेश म्हणजे या पावतीवरसुध्दा सदर योजनेचे नाव सक्षिप्त रूपात “MAD” असे लिहिलेले आहे. सर्वसाधारण वीज जोडणीसाठी MAD हि योजना उपलब्ध नव्हती.

त) मुळात २०१४ पासून अपिलार्थीच्या दृष्टीने हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा होता, तर, त्यांनी नियमा अंर्तगत त्वरीत 'अंर्तगत तक्रार निवारण कक्ष' व नंतर 'ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच' यांच्याकडे गाऱ्हाणे दाखल करणे अभिप्रेत होते. मात्र त्यांनी त्यांचे गाऱ्हाणे ग्राहक मंचाकडे दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी म्हणजे अंदाजे ६ वर्षानंतर दाखल केले. अपिलार्थीने सदर प्रकरण २०१७ मध्ये त्यांच्या लक्षात आले असे नमुद केले आहे, तेव्हा २०१७ नंतर सुध्दा दोन वर्षाच्या आत त्यांनी आपले गाऱ्हाणे मंचाकडे दाखल करणे अभिप्रेत होते.

थ) वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे प्रकरण गुणवत्तेवर, व ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ विनियम ६.६ च्या निकषावर पात्र ठरत नाही. तथापि, ग्राहकाचा वीज पुरवठा कायमस्वरूपी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

प्रतिवादी यांनी बंद केला असल्यामुळे कल्पीत थकबाकी (Fictitious arrears) वगळून ग्राहकास देयक देण्यात यावे तसेच शासन व महावितरण यांच्या सयुंक्त विद्यमाने थकबाकीबाबत सवलत देण्याची जर कोणती योजना अस्तित्वात असेल व अपिलार्थी त्याच्या निकषावर पात्र ठरत असेल, तर, त्याचा लाभ अपिलार्थीस, त्यांनी अर्ज केल्यानंतर देण्यात यावा.

द) या प्रकरणाच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अश्याप्रकारची अनेक प्रकरणे असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तेव्हा त्यांनी यासंबधात योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी व अश्या सर्व ग्राहकांना वीज देयके वितरीत केली जातात कि नाही, याची खातरजमा करावी. अश्या सर्व ग्राहकांना मीटरवर वीज पुरवठा कसा त्वरीत सुरू केला जाईल याबाबत वरीष्ठांशी चर्चा करून योग्य त्या उपाययोजना कराव्यात, जेणे करून त्यांना महसुलास मुकावे लागणार नाही.

७. सदरचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
दिपक लाड
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.